# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 17/08/2021 (मंगळवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील आयू डि पी काटोल येथे दिनांक 15/08/2021 चे 10.00 ते 16/08/2021 चे 07.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– ऋषीकेश रामचंन्द्र उईके, वय 21 वर्ष, रा. आयूडीपी काटोल हे परिवारासह कामानिमीत्य हिगणघाट येथे गेले असता घराशेजारी राहणारी प्रिंयका हर्षल उईके हिने फोन करून सांगीतले की, 'तुमचे घराचे दार उघडे दिसत आहे' अशा माहिती वरून फिर्यादी यांनी घरी येवून पाहणी केली असता समोरचे दाराला कुलुप लावलेले दिसले नाही व जिनाचे बाजूचा दरवाजा उघडा दिसला. त्यांनी घरात जावून पाहनी केली असता घरामधील सामान अस्तव्यस्त पडलेले दिसले. तसेच आलमारीतील पर्स मधील एक सोन्याची अंगठी किंमती 30,000/–रू. व नगदी 20,000/–रू. असा एकुण कि. 50,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संतोष आंधळे हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील वायगाव घोटुर्ली येथे फिर्यादी नामे– देवभुषण रामेश्वर यिंग, वय 50 वर्ष, रा. वायगांव घोटुर्ली हे दि. 13/08/2021 रोजी 18.30 वा. सुमारास मित्र विजय शर्मा यांना भेटण्याकरिता नागपूर येथे घराला कुलुप लावून गेले होते. दि. 16/08/2021 रोजी सकाळी 08.00 वा. सुमारास नागपुर येथे हजर असतांना घराशेजारील राहणारे लोकांनी फोन करून सांगितले की, 'तुमचे घराचे लॉक तुटलेले आहे'. लगेच फिर्यादी हे घरी आल्यानंतर पाहीले तर घराचे लॉक तुटलेले होते व कपाटातील तसेच दिवानमधील सामान फेकलेले होते व दिवानमध्ये ठेवलेले 20 वर्षापूर्वी विकत घेतलेले जूने वापरते सोन्या–चांदीचे दागिणे कि. 52,000/–रू. व नगदी 5,000/–रू. असा एकुण कि. 57,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रामेश्वर रावते मो. क्र. 9420409454 हे करीत आहे.

## जबर दुखापत

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 4 कि. मी. अंतरावरील खदान क्र. 3 मडडीबाबा, कन्हान येथे दिनांक 15/08/2021 चे 21.30 वा. चे 22.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– विश्वनाथ किचरवा कश्यप, वय 26 वर्ष, रा. गवली रा. खदान न 06 पाणी टाकी जवळ कन्हान व आरोपी नामे– राधेश्याम बंडूजी मेश्राम, वय 25 वर्ष, रा. खदान नं. 03, कन्हान हे एकमेकांना ओळखत असून फिर्यादी हे आपले घरातून आपले एमएच–40/एयु–4822 क्रमांकाच्या मोटर सायकल गाडीने जात असता आरोपी हा आपली मोटरसायकलने स्वताहून रस्त्यावर खाली पडल्याने आरोपी याने फिर्यादीला म्हटले की, तु देखके नाही चलाता क्या मै तेरे वजहसे गिरा हूॅ' असे म्हटले असता फिर्यादीने आरोपीला म्हटले की, 'तु खुद होकर गिरा हे' यावरून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून धक्काबुक्की करून खाली पाडले त्यामुळे फिर्यादीच्या डाव्या हाताला मार लागला व आरोपीने फिर्यादीला हातबुक्कीने नाकावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सहारे हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 9 कि. मी. अंतरावरील ढवळापुर येथे दिनांक 13/08/2021 चे 12.00 वा. चे 12.30 वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रभाकर बापुराव लोहे, वय 71 वर्ष, रा. ढवळापुर काटोल हे गाय चारण्याचे काम करतात. दि 13/08/2021 रोजी गाय चारण्याकरिता ते पारडी शिवारात गेले असता गाय अचानक आरोपी नामे– मिनीनाथ मुन्ना जगनानथ राउत, वय 48 वर्ष, रा. ढवळापुर काटोल याचे काकाचे शेतात गेली तेव्हा आरोपी तेथे आला व म्हणाला की, 'तुझी गाय माझ्या काकाचा शेतात मोसंबीचे झाडे खात आहे' असे म्हणून वादविवाद केला. यानंतर आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून बासाच्या काडीने मांडीवर, पायाच्या घुटण्यावर व पाठीवर मारल्याने हातात मुका मार लागला. फिर्यादीने खाजगी दवाखण्यात उपचार केले असता डावा हात फ्रॅक्चर असल्याचे आज संबधीत कागदपत्रावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास परिपोउपनि श्री दिनेश खोटेले मो नं 9404080666 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. सावनेर – दिनांक 16/08/2021 चे 08.00 वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गौतम मेश्राम मो. क्र. 8805047290 हे करीत आहे.

# विनयभंग

पो.स्टे. कुही :– दिनांक 15/08/2021 चे 18.00 वा. ते 18.30 वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय 36 वर्ष हिला आरोपी नामे– ललीत जगदीश झोडापे, वय 42 वर्ष, रा. मांढळ हा विनाकारण फोन करीत असतो. तसेच आरोपी नेहमी तिच्या स्कुटीचा पाठलाग त्याच्या मोटरसायकलने करून बरोबरीत चालवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व मारण्याची धमकी देत तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 354 (डी), 294, 504, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अनिल देरकर 8698052987 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर